माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- ८०/२०१९**

तक्रारकर्ता श्री.**विष्णु रामचंद्र अंबुसकर**
**रा.कपिलेश्वर, पो.वळद बु., ता.जि.अकोला**
**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
**ग्रामपंचायत कार्यालय कपिलेश्वर, ता.जि.अकोला**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **गटविकास अधिकारी,**
**पंचायत समिती अकोला, ता.जि.अकोला**

**तक्रार सुनावणी दिनांक - २५.०९.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | उपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि.०९.१२.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, माहिती अधिकार अर्ज पोष्टाने पाठविला होता. मात्र जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांनी माहिती अर्ज स्विकारला नाही घेण्यास नकार दिला. सदर अर्ज का स्विकारला नाही याबाबत चौकशी करण्यात यावी, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०९.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. त्यांचे प्रतिनिधी ॲड. एस.डी.पाटील हे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.दिपक लक्ष्मण मुणेश्वर व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गणेश शंकरराव गवळी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.११.२०१९ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, मौजे कपिलेश्वर येथील अर्जदाराचे नावाने असलेले घर क्र.५३ नं.४२×३२ ज्यास अतु:सिमा पूर्वेस रोड, पश्चिमेस आत्माराम सि.काटोळे, दक्षिणेस रोड, उत्तरेस खाली जागा चे नमूना ८ ची सन १९९७-९८ ची रजिष्टर प्रमाणे लेखी प्रत (सोबत ९८-९९ चे

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

दि.२७.०५.९९ चे कर पावतीची प्रत जोडली आहे) याबाबत माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज स्विकारला नसल्याचे कारण नमूद करून थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणात तक्रारकर्ता श्री.विष्णु रामचंद्र अंबुसकर यांचे दि.०५.११.२०१९ रोजी ग्रामपंचायत कपिलेश्वर येथील जन माहिती अधिकारी यांना सादर केलेला मौजे कपिलेश्वर येथील अर्जदाराचे नावाने असलेले घर क्र.५३ नं.४२×३२ ज्यास अतु:सिमा पूर्वेस रोड, पश्चिमेस आत्माराम सि.काटोळे, दक्षिणेस रोड, उत्तरेस खाली जागा चे नमूना ८ ची सन १९९७-९८ ची रजिष्टर प्रमाणे लेखी प्रत मिळाण्याबाबत केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्विकारण्यास नकार दिला असल्यामुळे थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे दि.०९.१२.२०१९ रोजी सादर केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी आयोगाच्या वतीने ग्रामपंचायत कपिलेश्वर, ता.जि.अकोला यांना सुनावणी सूचना जारी केल्यानंतर दि.१३.०९.२०२३ रोजी त्यांचेवतीने सविस्तर खुलासा सादर केला असून यात एकूण ९ दस्तावेजाचा संदर्भ देण्यात आलेला आहे. ही बाब लक्षात घेता, तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखावर माहिती उपलब्ध असल्याची वस्तुस्थिती सुस्पष्ट होत असून आयोगास पाठविलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने ग्रा.पं.कपिलेश्वर यांच्या अभिलेखावर जोडपत्र-अ मधील नमूद श्री.विष्णु रामचंद्र अंबुसकर यांच्या नावावर असलेले घर क्र.५३ संबंधात उपलब्ध नस्तीचे छायांकीत प्रत यातील संपूर्ण दस्तावेजांचे तक्रारकर्त्यास तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याचे निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०९.२०२३**

जावक क्रमांक 9223 दिनांक 20 FEB 2024